ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ पुणें, बुधवार तारीख २२ फेब्रुवारी, १९५६ अंक ८

## विविध माहिती

**करांच्या वेढ्यांतून मुक्तता**—गुजरात कॉलेजमधील विद्यार्थ्यांपुढें भाषण करतांना ले. जनरल थिमय्या म्हणाले कीं गुजरातच्या १ कोटी लोकसंख्येच्या मानानें लष्करांत फारच थोडे लोक आहेत. शस्त्रसज्ज दलांतील लोकांचें भवितव्य तर चांगलें असतेंच, पण त्यांची प्राप्तीवरील कर, वारसा कर, इत्यादि करांच्या वेढ्यांतूनहि मुक्तता होते. ह्यावर विद्यार्थ्यांत हास्याचे फवारे उडाले. ले. जन. थिमय्या ह्यांनीं अशीहि माहिती सांगितली कीं कूर्ग भागांत ४०,००० रहिवाशी आहेत. पण लष्करांत ३३० कुर्गी अधिकारी आहेत.

**कांडला बंदराचा विकास**—भारताच्या दर्यावर्दी वहातुकीच्या धंद्यांतील एक तज्ज्ञ, श्री. एम्. ए. मास्टर हे कच्छ–मांडवी येथें भाषण करतांना म्हणाले कीं कांडला बंदराचा विकास होण्यासाठीं बंदराच्या आसमंतांत मोठाले उद्योगधंदे काढण्यांत आले पाहिजेत. चुनखडीचा दगड भरपूर सांपडल्यास ह्या भागांत सिमेंटचे कारखाने काढणें शक्य आहे असेंहि ते म्हणाले.

**छापखान्याची शाळा**—छापखान्याच्या तांत्रिक ज्ञानाचें शिक्षण देणारी शाळा अलाहाबाद येथें काढण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. छापखान्याच्या व्यवसायाच्या निरनिराळ्या भागांचें शिक्षण दरसाल २०० विद्यार्थ्यांना देण्यांत येईल. शाळेच्या स्थापनेसाठीं १० लाख रुपये लागतील. त्यांपैकीं निम्मा खर्च राज्य–सरकार व निम्मा मध्यवर्ती सरकार करणार आहे.

**गव्हाची आयात**—मार्च महिन्यांत भारत ४२,००० टन गव्हाची आयात करणार आहे. त्यापैकीं २०,००० टन रशिआकडून, १८,००० टन ऑस्ट्रेलिआकडून आणि ४,००० टन अमेरिकेकडून मिळणार आहे. ही आयात झाल्यावर फेब्रुआरी व मार्च महिन्यांत मिळून ७१,००० टन गहूं आयात होईल.

**सिमेंटच्या कारखान्यांतील वेतन**—सिमेंटच्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनाबद्दल चौकशी करून शिफारसी करण्यासाठीं हैद्राबाद राज्य सरकारनें ५ सभासदांचें मंडळ नेमलें आहे. मंडळाचे अध्यक्ष लेबर कमिशनर आहेत. मंडळानें आपला अहवाल तीन महिन्यांत सादर करावयाचा आहे.

**रशिआची इजिप्तला मदत**—इजिप्तमध्यें अणुविज्ञानविषयक संशोधन करणारी प्रयोगशाळा काढण्यासाठीं रशिआ मदत करणार आहे. ह्या बाबतींत जरूर असलेलीं तांत्रिक व शास्त्रीय उपकरणेंहि पुरविण्यांत येणार आहेत. प्रयोगशाळेची उभारणी व काम ह्याविषयीं माहिती देण्यासाठीं रशिअन तज्ज्ञ इजिप्तला जाणार आहेत.

**आवडी कॉंग्रेसचा नफा**—गेल्या वर्षी आवडी येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे हिशोब प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. ह्या अधिवेशनांत सर्व खर्च वजा जाऊन ६,२५,६२० रुपये निव्वळ उत्पन्न झालें. ह्यापैकीं ३,२२,८८१ रुपये खुद्द अधिवेशनांतच मिळाले आणि ३,०२,७३९ रुपये त्यावेळीं भरविण्यांत आलेल्या प्रदर्शनापासून मिळाले.

**नागपूरसाठीं गौळवाडा**—मध्यप्रदेश सरकारनें नागपूर शहरांतील दुधाची मागणी व पुरवठा ह्यासंबंधीं तपासणी करण्याचें काम चालू केलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शहराच्या गरजा भागविण्यासाठीं आधुनिक पद्धतीचा गौळवाडा स्थापन करण्याचा सरकारचा विचार आहे. गौळवाड्यांतून रोज २५० मण दुधाचा पुरवठा करण्याचें घाटत आहे. योजनेच्या खर्चाचा आंकडा अद्याप ठरावयाचा आहे.

**निर्वासितांची पुनर्वसाहत**—पूर्व बंगालमधून निर्वासित होऊन आलेल्या ५,००० कुटुंबांची सौराष्ट्रांत वसाहत स्थापन करण्यांत येणार आहे. त्यांपैकीं ७०० कुटुंबें लवकरच सौराष्ट्रांत येतील. प्रत्येक कुटुंबाला जमीन, मच्छीमारीच्या बोटी व इतर मदत देण्यांत येणार आहे. सर्व मदत कर्जाऊ म्हणून दिली जाईल.

**बंगलोर येथील टेलिफोनचा कारखाना**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत बंगलोर येथील टेलिफोनच्या कारखान्याचा विस्तार करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं २१८ लाख रुपये लागतील. कारखान्यांत हल्लीं दरसाल ५०,००० टेलिफोन्स तयार होतात. दुसऱ्या कार्यक्रमाच्या शेवटीं दरसाल ८०,००० टेलिफोन्स तयार करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे.

**पाकिस्तानचें शिपिंग कॉर्पोरेशन**—पाकिस्तान सरकारनें दर्यावर्दी वहातुकीच्या व्यवस्थेसाठीं शिपिंग कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. दर्यावर्दी वहातुक करणाऱ्या कंपन्यांच्या कारभारांत एकसूत्रीपणा आणून वहातुकीचे दर कमी करण्याचा सरकारचा हेतु आहे. कॉर्पोरेशनच्या स्थापनेसाठीं ५ कोटी रुपयांचें भांडवल लागेल.

**ब्रह्मदेशाची कापडाची खरेदी**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें भारतांत माल खरेदी करण्यासाठीं आपले प्रतिनिधी पाठविले आहेत. प्रतिनिधींनीं भारतांत ५३,४१,६०० वार कापड खरेदी केलें आहे. कापडाची किंमत सुमारें ३० लाख रुपये होईल. १ ते १·१ कोटी वार कापड खरेदी करण्याचा प्रतिनिधी–मंडळाचा विचार आहे. खरेदी केलेलें कापड ब्रह्मदेशांत पाठविण्यासाठीं खास तरतूद करण्यांत आली आहे.

**शेतीच्या मालाला बाजारपेठ**—अमेरिका व ब्रह्मदेश ह्या देशांत व्यापारी करार करण्यांत आला आहे. अमेरिकेंत पडून असलेला शेतीचा ९·८ कोटी रुपये किंमतीचा माल ब्रह्मदेश घेणार असून किंमत ब्रह्मी चलनांत देणार आहे. कापूस, दुधाचे पदार्थ, तंबाखू, फळें, इत्यादि माल अमेरिका देणार आहे. ब्रह्म-देशाला डॉलर्स मोजावे लागणार नाहींत.

**खाणी चालविण्यासाठीं तंत्रज्ञ**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कोळशाचें उत्पादन वाढविण्याचें ठरविण्यांत आलें आहे. सरकारी मालकीच्या कोळशाच्या खाणींतील उत्पादन वाढविण्यासाठी खाणीविषयक तंत्रज्ञांची जरूरी भासत असल्यानें भारतीय सरकारनें असे तंत्रज्ञ शिक्षण देऊन तयार करण्याचें ठरविलें आहे. तंत्रज्ञांना शिक्षण देण्यासाठीं ४ ठिकाणीं केंद्रें खोलण्यांत येणार आहेत.

**मला दारूचा परवाना नको**—पश्चिम जर्मनींतील एक व्यापारी कांहीं दिवसांपूर्वी मुंबईंत आले असतांना त्यांच्यासाठीं दारूचा परवाना देण्यांत आला होता. पण त्यांनीं परवान्याचा उपयोग न करतां तो परत केला. मुंबई राज्यांतील दारूबंदीच्या कायद्याप्रमाणें आपणास वागावयाचें आहे; शिवाय उष्ण हवा-मानाच्या देशांत दारूची जरूरीहि नसते; असे विचार त्यांनीं व्यक्त केले.

**कॉमनवेल्थ राष्ट्रांत अणु-वीज-केंद्रें**—कॉमनवेल्थ गटां-तील राष्ट्रांत अणुशक्तीचा उपयोग करून वीज उत्पन्न करण्याचे कारखाने काढण्याची योजना एका अमेरिकन कंपनीनें ब्रिटिश कंपनीच्या साह्यानें तयार केली आहे. अमेरिकन कंपनीचे अध्यक्ष जनरल बेडेल स्मिथ म्हणाले कीं अमेरिकन व ब्रिटिश कंपन्यांत झालेला अणुशक्तीविषयक हा पहिलाच करार आहे.

**आदिवासींच्या सुधारणेसाठीं**—सुरत जिल्ह्यांतील धरमपूर तालुक्यांत वसति करणाऱ्या आदिवासी लोकांच्या कल्याणासाठी विकासयोजना चालू करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्या कार्यासाठी १,२५,००० रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे. बंधारे बांधणें, विहिरी खोदणें व त्यांची दुरुस्ती करणें, अशा कामावर रक्कम खर्च करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तान-इटली व्यापारी करार**—पाकिस्तान व इटली ह्यांनीं परस्परांत १ वर्ष मुदतीचा व्यापारी करार केला आहे. पाकिस्तान कापूस, ताग, लोकर, कांतडी, गोठलेले मासे, इत्यादि माल निर्यात करणार असून इटलीकडून कृत्रिम रेशीम, यंत्रें, रंग, औषधें, टायर्स व टयूब्स, लोखंड व पोलादाचा माल आयात करणार आहे.


अन्नाचें रहस्य





बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—गुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —








दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिडयूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# अर्थ

बुधवार, ता. २१ फेब्रुवारी, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतीय रेल्वे-वहातुकीचा विस्तार

भारतामधील रेल्वे-वहातुकीचा अभ्यास करून तिचा विस्तार करण्यासाठी शिफारसी करण्याच्या हेतूनें अमेरिकन तज्ज्ञांचें एक मंडळ लवकरच भारतांत येणार आहे. ह्यासंबंधीच्या करारावर उभयता देशांच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्या आहेत. रेल्वे वहातुकीच्या वाढत्या गरजा लक्षांत घेऊन अमेरिकेकडून जरूर ती मदत मिळविण्याच्या प्रयत्नांत भारत गेलें वर्षभर आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत देशांतील रेल्वे-वहातुकीची वाढ करण्याची मोठी योजना आंखण्यांत आली आहे. सर्व योजना पूर्ण झाल्यावर भारतीय रेल्वेवर होणारी प्रवाशांची व मालाची वहातूक सध्यांपेक्षां दुप्पट होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे. सर्व देशभर कित्येक मैल रेल्वे विजेवर चालणारी करण्यांत येणार आहे. ३,००० मैल लांबीचे नवे रेल्वेमार्ग बांधण्यांत येणार आहेत. रेल्वेच्या एंजिनांचें उत्पादनहि दरसाल ४०० पर्यंत वाढविण्यांत यावयाचें आहे. पण विस्ताराची योजना अमलांत येण्यास रेल्वेविषयक तज्ज्ञांच्या मदतीची फार आवश्यकता आहे. रेल्वे-वहातुकीच्या बाबतींत अमेरिका हें राष्ट्र कार्यक्षमतेच्या व अनुभवाच्या दृष्टीनें अग्रेसर आहे. त्यामुळें अमेरिकन तज्ज्ञांची मदत भारताला फार उपयुक्त ठरणार आहे. वहातूक, सिग्नलिंग, एंजिनिअरिंग, अशा विविध खात्यांतील तज्ज्ञांचा समावेश अमेरिकेहून येणाऱ्या मंडळांत करण्यांत येणार आहे. न्यूयॉर्कमधील सँडरसन अँड पोर्टर ही कंपनी जरूर त्या सर्व प्रकारचे तज्ज्ञ एकत्र करून त्यांना भारतांत पाठविण्याचें कार्य करणार आहे. इंटरनॅशनल को-ऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशन ही संघटना अमेरिकन तज्ज्ञांचे पगार व प्रवासखर्च डॉलर्समध्यें देणार आहे. भारताला अमेरिकेकडून जी आर्थिक मदत मिळणार आहे तीमधून हा खर्च करण्यांत येईल. तज्ज्ञांचा पगार व भारतांत जाण्या-येण्याचा खर्च सुमारें ४,५०,००० डॉलर्स होईल.

अमेरिकन तंत्रज्ञ भारतांत तीन महिने राहतील. त्या काळांतील त्यांचा खर्च भारतीय सरकार करील. हा खर्च अर्थातच रुपयांत दिला जाईल. खर्चाचा डॉलर्समधील आंकडा ७०,००० इतका होईल. म्हणजे तीन महिन्यांत भारताला ह्या कामासाठी ५,२०,००० डॉलर्स खर्च करावा लागेल. तीन महिन्यांच्या अवधींत भारतीय रेल्वेच्या सध्यांच्या वाहतूक-व्यवस्थेची तपासणी अमेरिकन मंडळ करील आणि तिचा अधिक विस्तार करण्याच्या उत्तमांतल्या उत्तम मार्गाचें दिग्दर्शन करील. मंडळानें केलेल्या शिफारसींचा सरकारतर्फे विचार करण्यांत येऊन त्यांच्यापैकीं कोठल्या स्वीकाराच्या हें ठरविण्यांत येईल. त्यानंतर स्वीकृत शिफारसी अंमलांत आणण्यासाठीं काय करावें तें तपशीलवार ठरविण्यासाठी पुन्हां एकदां अमेरिकन तज्ज्ञांना पाचारण करण्यांत येईल. भारतीय रेल्वेविषयीं त्यांना कांहीं माहिती लागली तर ती पुरविण्यासाठी कांहीं भारतीय रेल्वे-एंजिनिअर्स त्यांच्या दिमतीला देण्यांत येतील. अमेरिकन तज्ज्ञांची मदत घेण्यास आणखीहि एक कारण आहे. अमेरिकन रेल्वे-वहातूक व भारतीय रेल्वे-वहातूक ह्यांच्यांत बरेंच साम्य आहे. शिवाय, आज भारतीय-रेल्वेवहातुकीपुढें जे प्रश्न उभे आहेत ते अमेरिकेंत आधींच सोडविण्यांत आलेले आहेत. अमेरिकेंतील रेल्वेमार्ग हा जगांतील इतर कोणत्याहि देशांतील रेल्वेमार्गापेक्षा अधिक म्हणजे २,२३,००० मैल लांबीचा आहे. प्रवाशांची व मालाची वहातूक ह्या बाबतींतहि अमेरिकेचा अनुक्रम पहिला आहे.

---

## अमेरिकेच्या आर्थिक मदतीचा हेतु

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आर्थिक, आशिआविषयक, उपसंघटनेचें अधिवेशन बंगलोर येथें यशस्वीरीत्या पार पडलें. अधिवेशनाच्या कामकाजांत भाग घेण्यासाठीं आलेल्या अमेरिकन प्रतिनिधीमंडळाचे पुढारी मि. हेन्री जोन्स ह्यांच्या स्वागतार्थ म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेनें समारंभ घडवून आणला होता. ह्या प्रसंगीं भाषण करतांना मि. जोन्स ह्यांनीं अविकसित देशांना अमेरिकेकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीविषयीं कांहीं विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, सध्यांचें जग आहे त्याच स्वरूपांत फार दिवस राहूं शकणार नाहीं असा अमेरिकन लोकांचा पक्का विश्वास आहे. आज जगांतील लोकांच्या राहाणीच्या मानांत बरीच तफावत आहे. पण हा फरक कमी कमी होऊन अखेर सर्व जगांतील लोकांचें जीवनमान कमी-अधिक प्रमाणांत एकाच पातळीवर आल्याशिवाय रहाणार नाहीं. अविकसित देशांतील लोकांची परिस्थिति सुधारावी म्हणून अमेरिका जें साह्य करीत आहे त्याचा उगम वरील विश्वासांतच आहे. हल्लींचें जग अगदीं अक्षरशः 'एक' आहे ह्याची जाणीव अमेरिकन लोकांना झालेली आहे. भारत, इंडोनेशिआ व आशिआंतील इतर मागासलेल्या देशांना मदत देऊन तेथील लोकांचें दारिद्र्य दूर करणें आपल्याच हिताचें आहे ही गोष्टहि अमेरिकन लोकांना पटलेली आहे. कोणत्याहि स्वतंत्र देशाला बळकट आर्थिक पायाची आणि सुखी-समाधानी लोकांची अतिशय जरूर आहे असा आमचा दृढ-विश्वास आहे. आशिआंतील राष्ट्रांना आम्ही जी मदत करीत आहों, ती केवळ भांडवल गुंतविण्याच्या बुद्धीनें करीत आहों असें नाहीं. आर्थिक विकासाच्या ह्या कामांत आम्हांवर पडणाऱ्या जबाबदाऱ्याहि आशिआंतील लोकांना अंशतः आपल्या खांद्यावर घ्याव्या अशी आमची इच्छा आहे.

---

**इजिप्तमधील धरणाला मदत**—इजिप्तमध्यें आस्वान ह्या ठिकाणीं मोठें धरण बांधण्याच्या योजनेबद्दल इजिप्तच्या सरकारची जागतिक बँकेच्या प्रतिनिधींशीं बोलणीं चालू होतीं. ह्या वाटाघाटी यशस्वी झाल्या असून लवकरच अधिकृत पत्रक काढण्यांत येणार आहे. धरणाचें काम पूर्ण करण्यासाठीं बँकेकडून २० कोटी डॉलर्सचें कर्ज इजिप्तला पाहिजे आहे.

## जर्मन उद्योगपतींचा आशिआंतीक दौरा

जगप्रसिद्ध जर्मन उद्योगपती अलफ्रेड क्रुप हे आशिआंतील कांहीं देशांत दौरा करण्यास निघाले आहेत. आपल्या दौऱ्यांत ते भारत, पाकिस्तान, सीलोन व सयाम ह्या देशांत फिरणार असून एंजिनिअरिंगच्या मालाचा उठाव कसा व कितपत होऊं शकेल ह्याविषयीं पहाणी करणार आहेत. आशिआंतील बऱ्याच देशांनीं आपआपल्या औद्योगिक विकासाचे कार्यक्रम आखले असल्यामुळें यंत्रसामुग्रीची मोठी बाजारपेठ उपलब्ध झालेली आहे. तिचा फायदा घेण्याचा त्यांचा विचार आहे. पश्चिम जर्मनीचे व्हाइस चॅन्सेलर नुकतेंच, गेल्या महिन्यांत, भारतांत येऊन गेले. त्यांच्या भेटीमुळें भारत व पश्चिम जर्मनी ह्या देशांतील व्यापार अधिक वाढविण्याची कल्पना जोर धरूं लागली होतीच. आतां क्रुप ह्यांच्याप्रमाणें आणखीहि कांहीं प्रमुख जर्मन उद्योगपती भारतांत येणार आहेत. जर्मनीच्या फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मि. फ्रिटसबर्ग हे आपल्या कांहीं सहकाऱ्यांना घेऊन येणार आहेत. त्यांच्या सहकाऱ्यांत पोलादाच्या धंद्याचा एक व दुर्बिणीसारख्या उपकरणांना लागणारीं भिंगें तयार करण्याच्या धंद्याचा एक असे दोन तज्ज्ञ आहेत. गेल्या महायुद्धांत जर्मनीचीं 'फॉक वूल्फ' हीं विमानें प्रसिद्ध पावलेलीं आहेत. ह्या विमानांच्या बांधणीचे कल्पक मि. कर्ट टँक हेहि भारतांत येणार आहेत. भारताच्या विमान-बांधणीच्या धंद्याला काय मदत देतां येईल ह्याची तपासणी ते करणार आहेत. भारताच्या औद्योगीकरणाच्या बाबतींत जर्मन तंत्रज्ञ विशेष आस्था दाखवीत आहेत असें समजतें. १९३९ पासून भारताशीं असलेले व्यापारी संबंध तुटले होते, ते पुन्हां सांधण्याचा त्यांचा विचार आहे. हल्लीं भारत पश्चिम जर्मनीकडून दरसाल ५ कोटी पौंड किंमतीचा माल आयात करतो.

## साखरेच्या कारखान्यांची जपानी यंत्रसामुग्री

साखरेच्या धंद्यांतील तंत्रज्ञांची आंतरराष्ट्रीय परिषद दिल्ली येथें भरली होती. ह्या परिषदेला जपानचें प्रतिनिधी-मंडळ आलें होतें. प्रतिनिधीमंडळाचे नेते डॉ. थामाना ह्यांनीं भारतामधील साखरेचे कारखाने काढण्याची शक्यता व त्या बाबतींत जपानकडून मिळूं शकणारें साह्य ह्याविषयीं आपले विचार एका मुलाखतींत व्यक्त केले. ते म्हणाले कीं युद्धापूर्वी जपानमध्यें साखरेचे ५० मोठे कारखाने होते व ते चांगले चाललेले होते. कारखान्यांतील यंत्रसामुग्री इतकी उत्तम प्रतीची होती कीं उसाच्या रसांतील ९८ टक्के साखर पदरांत पडत असे. जपाननें फोर्मोसामध्येंहि साखरेच्या कारखान्याची यंत्रसामुग्री पुरविली होती. ह्या कारखान्यांच्या उभारणीचें कामहि जपानी तंत्रज्ञांनींच केलेलें होतें. फोर्मोसांतील उसाच्या मळ्यावर उभारण्यांत आलेल्या कारखान्यांतून जी साखर तयार होत असे ती इतर देशांच्या साखरेशीं स्पर्धा करूं शकत असे. साखरेच्या धंद्याला लागणारें यंत्रसाहित्य तयार करण्याच्या कामीं जपानला चांगला अनुभव आहे. सध्यां ब्रह्मदेशांत उसापासून साखर तयार करण्याचा एक मोठा कारखाना जपानी तंत्रज्ञ उभारीत आहेत. साखरेच्या कारखान्याला लागणारीं सर्व यंत्रें जपान पुरवूं शकेल. पुष्कळशा कारखान्यांतून तीं वापरण्यांत येत आहेत. शिवाय, इतर देशांत तयार केलेल्या सामुग्रीपेक्षा जपानी यंत्रें स्वस्तहि आहेत. भारतानें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत साखरेच्या धंद्याचा विकास करण्याचें ठरविलें आहे. जपानमधील भारी यंत्रसामुग्रीचा धंदा चांगला प्रगत झालेला असल्यामुळें ह्या बाबतींत भारताच्या गरजा जपान भागवूं शकेल. ह्या गरजा कशा रीतीनें भागवितां येतील तें पहाण्यासाठी जपानचें प्रतिनिधी-मंडळ आलें.

## कमी उत्पन्नवाल्यांसाठी घरांची योजना

कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांची रहात्या घरांची सोय करण्यासाठी भारतीय सरकारनें एक योजना तयार केली होती. पण ह्या योजनेचा फायदा मुंबई राज्यांत व इतर राज्यांत फारसा घेण्यांत आला नाहीं. खाजगी व्यक्ति व सहकारी संस्था ह्यांना घरें बांधण्याच्या खर्चापैकीं ८० टक्के रक्कम कर्जाऊ मिळण्याची सोय योजनेंत करण्यांत आली होती. जास्तींत जास्त १०,००० रुपयांचें कर्ज मिळण्याची तरतूद तींत होती. ह्या कामासाठी राज्य सरकारांना २० कोटी रुपयांचीं कर्जें भारतीय सरकारकडून मिळण्याची व्यवस्था चालू आर्थिक वर्षांत करण्यांत आली होती. योजनेची प्रसिद्धीहि चांगली करण्यांत आली होती. पण इतकें करूनहि भारतीय सरकारकडे फक्त ५ ते ६ कोटी रुपयांची मागणी राज्य-सरकारांकडून करण्यांत आली आहे असें समजतें. मुंबई सरकारला २२५ लाख रुपये मिळावयाचें होतें. घरें बांधण्यासाठी ह्या रकमेचा फायदा घेण्यांत येईल असा अंदाज होता. पण प्रत्यक्षांत तसें कांहीं झालें नाहीं. आतांपर्यंत मुंबई सरकारनें एकाहि व्यक्तीला अगर सहकारी संस्थेला वरील निधींतून कर्ज दिलेलें नाहीं. तथापि, सरकारनें तीन म्युनिसिपल कॉर्पोरेशन्सना मिळून २५ लाख रुपयांची रक्कम दिली आहे. कॉर्पोरेशन्सना आपल्या नोकरवर्गाला रहाण्यासाठी चाळी बांधावयाच्या असतील तर त्या कामासाठी कर्ज देण्याची व्यवस्था योजनेंत आहे. मुंबई सरकारच्या विकास व अर्थ खात्यानें कर्जें देण्याबाबत जे नियम तयार केले आहेत, ते इतके अवास्तव आहेत आणि कर्जें मिळण्याची पद्धत इतकी अडचणीची आहे कीं कर्जें सहजासहजीं न मिळूं देण्याचाच हेतु असावा कीं काय अशी शंका प्रदर्शित करण्यांत येत आहे !

## मुंबई येथें चहाच्या प्रसारासाठी आकर्षक योजना

इंडियन टी बोर्ड मुंबई येथें एक अद्ययावत् चहाकेंद्र उघडणार आहे. चर्च गेट रेल्वे स्टेशन नजीक रेशमभवनमध्यें त्याची योजना केली आहे. सर्व जागा एअरकंडिशन केली जाईल व त्यांत चहाच्या मळ्यांचीं दृश्यें, आधुनिक स्वैंपाकगृहाचे नमुने व आकडेवारी माहिती मांडण्यांत येईल. जनतेला चांगला चहा कसा करावा, हें शिकविलें जाईल. ४२ लोक बसूं शकतील, एवढ्या एका थिएटरांत चहाविषयीं चित्रपट दिवसांतून सहा ते सात वेळां मोफत दाखविले जातील. चहा पिण्याच्या जागेंत ५२ लोकांची सोय केली जाईल, तेथें चहाबरोबर इतरहि पदार्थ मिळूं शकतील. एका लेडी मॅनेजरच्या देखरेखेखालीं हें केंद्र चालेल.

## अंदमानमध्यें पहिली बँक-कचेरी

चालू वर्षांत, बंगालच्या उपसागरांतील अंदमान-निकोबार बेटांमधील पोर्ट ब्लेअर येथें स्टेट बँक ऑफ इंडिया आपली कचेरी उघडणार आहे. पोर्ट ब्लेअर कलकत्त्यापासून ६०० मैल दूर आहे. स्टेट बँक बंगाल सर्कलमध्यें ( पश्चिम बंगाल, ओरिसा, बिहार, आसाम, संयुक्त प्रदेश व काश्मीर ) १९५६ सालांत एकूण ६८ शाखा उघडील. बँक तिच्या पंचवार्षिक योजनेंत ४०० शाखा उघडणार आहे. त्यांपैकीं सुमारें ५०% शाखा बंगाल सर्कलच्या वांट्यास येतील.

## बँकेवर खोट खाण्याचा प्रसंग टळला

### मुंबई हायकोर्टाचा उद्बोधक निवाडा

( लेखक :—श्री. स. वा. दातार, एलएल. बी. )

' ओरिओल इंडस्ट्रिज लि. ' या नांवाची एक कंपनी १९४५ साली नोंदविण्यांत आली. ' पोदार चक्को ॲन्ड को. ' या पेढीकडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी देण्यांत आली. पोदार व चक्को असे दोघे त्या मॅनेजिंग एजन्सी पेढीचे भागीदार होते. ते दोघे कंपनीचे डायरेक्टरहि होते. कंपनीचें खातें बॉबे मर्कन्टाइल बँक लि. मध्यें उघडावें व तें खातें कंपनीतर्फे मॅनेजिंग एजंट पोदार व चक्को यांनीं दोघांनीं जोडीनें व या दोघांच्या आदेशानुसार चालवावें असा ठराव करण्यांत आला आणि त्याप्रमाणें खातें उघडण्यांत आलें. त्यानंतरच्या सुमारें दोन महिन्यांत पोदार व चक्को यांनीं कंपनीच्या त्या खात्यावर अठ्ठावीस चेकस् काढले व ते मंजूर करून बँकेनें एकूण सुमारें २९०००/– रुपयांचा बटवडा केला.

१९४६ सालीं खास ठरावानें कंपनी गुंडाळण्याचें ठरलें व लिक्विडेटरांची नेमणूक करण्यांत आली. लिक्विडेटर यांनीं वरील चेकस् करून बँकेनें बटवडा केलेले २९०००/– रुपये बँकेकडून भरून मागितले; व त्यासाठीं दावा लावला. दरम्यान कंपनीचा कारभार गुंडाळण्याविषयींचा खास ठरावच कोर्टानें रद्द ठरवला. पण कंपनीला बँकेकडून पैसे परत मिळण्यासारखी ही युक्ति बरी वाटली. लिक्विडेटरांचें नांव कमी करून कंपनीनें स्वतः हा दावा चालविण्याचें ठरवलें. कंपनीचें म्हणणें असें होतें कीं पोदार व चक्को यांनीं काढलेलें वरील चेकस् बरोबर रीतीनें काढलेले नाहींत. त्या चेक्सवर ' कंपनीकरितां ' पोदार व चक्को अशा सह्या नाहींत. फक्त पोदार व चक्को अशा सह्या आहेत. त्यामुळें ते चेकस् पोदार व चक्को यांचे खाजगी चेक ठरतात. कंपनीवर ते चेक बंधनकारक होत नाहींत. अशा चेकसूचे बँकेनें पैसे द्यावयास नको होते. सबब बँक या पैशाची भरपाई करून द्यावयास जबाबदार आहे. सारांश, बिचाऱ्या बँकेनें पैसे देऊनच्या देऊन तिच्या पदरीं उलट खोट खाण्याचा प्रसंग आला.

प्रकरण कोर्टात गेलें. चेकसूवर कंपनीकरितां पोदार व चक्को अशाच सह्या करावयास पाहिजे होत्या. तशा सह्या नसतांना बँकेनें पैसे दिले तें कंपनीस भरून मिळालें पाहिजेत असा खालच्या कोर्टानें निकाल दिला. मात्र २९,००० पैकीं ९,००० रुपयांचा खर्च कंपनीच्या हिशेबांत स्पष्टपणें सांपडल्यामुळें तेवढी रक्कम कमी करून कोर्टानें २०,००० रुपयांचा हुकुमनामा केला.

मुंबई हायकोर्टाचे सर न्यायाधीश श्री. छगला यांनीं अपिलांत खालच्या कोर्टाचा निकाल फिरवला. चेकसूवर सह्या करण्यांत तांत्रिक दोष घडले होते हें खरें, परंतु या व्यवहारांत बँक ही कंपनीची पैसे देण्यापुरती एजंट आहे. कंपनीचे बँकेशीं दुसरे कोणतेहि व्यवहार नाहींत. बँकेंत फक्त कंपनीचेंच खातें असून त्यावर पोदार व चक्को यांनीं काढलेले सर्व चेकस् कंपनीच्या चेकबुकांतीलच आहेत. त्या चेकसूवरून दिलेले सर्व पैसे कंपनीच्या व्यवहारांसाठींच दिलेले आहेत. अशा स्थितींत बँक ही कंपनीच्या व तिच्या डायरेक्टरांच्या आदेशानुसारच प्रामाणिकपणें वागलेली आहे. कंपनीवर बंधनकारक व्हावयास सह्या कशा केल्या जाव्यांत त्यांचे नियम व कंपनीनें अधिकार दिलेल्या इसमांनीं कंपनीकरितां पैशांचा बटवडा करण्यासाठीं कंपनीच्या बँकेस जे आदेश द्यावयाचे त्यांच्यावर सह्या कशा असाव्यात याबद्दलचे नियम हे निरनिराळे असून या व्यवहारांत कंपनीकडून बँकेवर काढण्यांत आलेले चेकस् स्पष्टपणें कंपनीनें अधिकार दिलेल्या इसमांचे सह्यांनिशी असल्यामुळें ते कंपनीवर बंधनकारक आहेत, असें न्यायमूर्तींनीं निवाड्यांत लिहिलें आहे.

( 57 Bom. L. R. 1039 )

## जातीयता नष्ट करण्यासाठी पोस्टाचे छाप

भारतांतील जातीयता व अस्पृश्यता ह्याविरुद्ध लोकमत निर्माण करण्यासाठी पोस्टखात्यानें तिकिटावर मारावयाचे नवे छाप तयार केले आहेत, ते २७४ पोस्टऑफिसांतून वापरण्यांत येतील. " जातीचा विचार करूं नका, जात विचारूं नका, सांगूं नका " आणि " अस्पृश्यता हा देव आणि मानव ह्यांचेविरुद्ध गुन्हा होय " अशीं दोन वाक्यें शिक्क्यासाठी प्रथम निवडण्यांत आलीं आहेत.

## बड्या पांच हिंदी बँका

हिंदी बड्या बँकांना गेलें वर्ष समाधानकारक गेलें. बँक ऑफ इंडिया व युनायटेड कमर्शिअल बँक ह्या बँकांच्या नफ्यांत बरीच वाढ झाली. यु. क. बँकेनें अर्ध्या टक्क्यानें डिव्हिडंड वाढवलें; बाकीच्यांनीं मागील दर कायम राखला. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत गेल्या वर्षी ९४ कोटी रुपयांची भर पडून एकूण ठेवींची रक्कम १०३३ कोटी रुपये झाली. त्यांच्या कर्जांत ८० कोटी रुपयांची व सरकारी रोख्यांतील गुंतवणुकींत ३८ कोटी रुपयांची वाढ झाली. बड्या पांच बँकांचे आंकडे खाली दिले आहेत :—

| - | नफा ( लक्ष रु. ) | १९५५ डिव्हिडंड % | नफा ( लक्ष रु. ) | १९५४ डिव्हिडंड % |
|---|---|---|---|---|
| स्टेट बँक | १३५·९४ | १६ | १३९·९१ | १६ |
| सेंट्रल बँक | ७७·७६ | १२ | ७७·८९ | १२ |
| बँक ऑफ इंडिया | ८४·९१ | १६ | ७७·०१ | १४ |
| बँक ऑफ बरोडा | २९·६५ | १२ | २८·०२ | १२ |
| युनायटेड कमर्शिअल | ३६·६९ | ५½ | २९·०६ | ५ |

## बँकांना छोटीशी सूचना

कोर्ट फी ॲक्टमध्यें गतवर्षीं झालेल्या दुरुस्तीपासून, ज्या दाव्यांत तडजोड होईल त्या व तत्सम दाव्यांतील फिर्यादअर्जावर भरलेल्या कोर्टफीपैकीं सुमारें निम्मी अथवा दोन तृतीयांश कोर्टफी परत मिळूं लागली आहे. त्यासाठीं कोर्टाकडून दाखला व तपशीलपत्रक ( Certificate and statement ) मिळतें. तें सरकारी तिजोरीकडे हजर करावयाचें असतें व सरकारी तिजोरींतून ही परतीची रक्कम मिळते. सदर दाखला व तपशीलपत्रक चेकप्रमाणें बँकेकडे वसुलीसाठीं देतां येते व बँकेचा मार्गच सुलभ असल्यामुळें बँकांकडे हें काम आतां पुष्कळ येऊं लागलें आहे. सरकारी तिजोरीकडून रक्कम खात्यावर जमा होऊन आली कीं बँक तीवर आपलें कमिशन आकारून खातेदारास त्याबद्दल पत्र पाठवतें. या पत्रांतच पावती तिकिटासाठीं खर्ची पडलेला एक आणा बँकांनीं दाखवावा अशी त्यांना सूचना आहे. सध्यां तो एक आणा बँका त्या पत्रांत दाखवीत नाहींत, परंतु खात्यावर मात्र एक आणा खर्ची टाकतात. त्यामुळें वकिलांनीं जर आपल्या बँकेकडून ही रक्कम वसूल करून आणवली असेल तर बँकेकडून आलेलें पत्र पक्षकारांना दाखविण्यास त्यांना उपयोगी पडत नाहीं; तें अपुरें असतें; त्यांत कमिशन तेवढें दाखवलेलें असतें पण पावती-तिकिटाचा एक आणा मात्र दाखवला नसतो. बँकांनीं कमिशनबरोबर पावती तिकिटाचा खर्च अशा पत्रांत दाखवल्यास या पत्रांचा उपयोग अधिक होईल.

—स. वा. दा.

## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा

मध्यवर्ती सरकार व राज्य सरकारें यांनीं १९५६ ते १९६१ ह्या योजनेच्या मुदतींत विकासकार्यासाठी ४,८०० कोटी रु. चा खर्च आंखला आहे. तसेंच खासगी क्षेत्रासाठी २,३०० कोटींची भांडवली गुंतवणूक संकल्पिण्यांत आली आहे.

### उद्दिष्टें

देशांतील जीवनमानाची पातळी उंचविण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नांत भक्कम वाढ करणें, पायाभूत व अवजड उद्योगधंद्यांवर विशेष भर देऊन शीघ्र गतीनें औद्योगीकरण घडवून आणणें, नोकरी व कामधंद्याच्या संधींत भरपूर वाढ करणें व उत्पन्न आणि संपत्ति याबाबतींत असलेली विषमता कमी करणें, तसेंच आर्थिक शक्तीचें समविभाजन घडवून आणणें, आणि समाजवादी समाजरचना आकारास आणण्याचें ध्येय समोर ठवून योजना मार्गक्रमण करणार आहे. औद्योगिक व खनिज विकासामुळें भविष्य काळांत जलद गतीनें आर्थिक प्रगति घडवून आणणें शक्य होत असल्यामुळें त्यावर मुख्यतः भर देण्यांत आला आहे. योजना लक्षावधि लोकांच्या आकांक्षांना मूर्तरूप देण्याचें कार्य करणारी असून दारिद्र्यविमोचनाचें व जीवनमान वाढविण्याचें सर्वांपुढें असलेलें उद्दिष्ट पूर्ण करण्याची आपणांपैकीं प्रत्येकास संधि देते.

### जनतेचें मत कळण्याची अपेक्षा

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी नियोजनमंडळानें केलेल्या सूचना ग्रथित करण्यांत आलेला हा कच्चा मसुदा जनतेच्या माहितीसाठी आणि तत्संबंधीं जनतेचें मत कांहीं सूचना असल्यास त्या कळाव्यात म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे. या सर्व गोष्टी विचारांत घेतल्यानंतर दुसरी योजना पक्क्या स्वरूपांत सादर करण्यांत येईल.

### समाजाची समाजवादी रचना

समाजवादी समाजरचनेची स्थापना करणें हें आपल्या आर्थिक धोरणाचें उद्दिष्ट असल्याचें मान्य करण्यांत आलें आहे. याचाच अर्थ असा कीं, खाजगी नफा नव्हे तर समाजाचें हित हेंच प्रगति झाली कीं नाहीं तें ठरविण्याचें गमक राहील. उत्पादन, वांटप, खप व भांडवल गुंतवणूक इतकेंच नव्हें तर सामाजिक व आर्थिक संबंध यांचें संपूर्ण स्वरूप या सामाजिक ध्येयानें प्रेरित झालेल्या यंत्रणांनींच ठरविलें पाहिजे. आर्थिक विकासाचा लाभ अधिकाधिक प्रमाणांत गरिबांसच मिळाला पाहिजे आणि उत्पन्न, संपत्ति व आर्थिक सत्ता यांच्या केंद्रीकरणांत क्रमशः घट झाली पाहिजे. आतांपर्यंत ज्या सामान्य व गरीब माणसास संघटित प्रयत्नांनीं आपला विकास साधतां आला नाहीं त्यास तशी संधि मिळवून देऊन त्याच्या राहाणीमानांत वाढ करण्याचा व त्यायोगें देशाची भरभराट घडवून आणण्याचा हा प्रश्न आहे. हें ध्येय साध्य करीत असतांच त्याच्या आर्थिक व सामाजिक दर्जांत वाढ होईल. जनतेच्या वतीनें काम करणारी एक यंत्रणा या नात्यानें ही परिस्थिति निर्माण करण्याची जबाबदारी मुख्यवें सरकारलाच आपल्या शिरावर घ्यावी लागेल. यासाठी सरकारी क्षेत्राचा झपाट्यानें विकास व्हावा लागेल आणि खाजगी क्षेत्रासहि समाजानें स्वीकारलेल्या व्यापक योजनेच्या चौकटींत राहून आपली कामगिरी पार पाडावी लागेल.

### समोर असलेलें कार्य

थोडक्यांत म्हणजे, मध्यवर्ती आणि राज्य सरकारांनीं मिळून येत्या पांच वर्षांत एकूण ४,८०० कोटी रु. खर्च करण्याचें ठरविलें आहे. ह्यापैकीं १८ टक्के रक्कम पाटबंधारे व वीज याकरतां, १२ टक्के रक्कम समाज विकास योजना व राष्ट्रीय विस्तार संघटना यांसह शेतकीसाठी, १९ टक्के रक्कम उद्योगधंदे व खनिजें यांवर, २९ टक्के रक्कम वाहतूक व दळणवळणावर, २० टक्के रक्कम घरबांधणीसह इतर सामाजिक कार्यांवर व स्थलांतरितांच्या पुनर्वसाहतीसाठीं वापरण्यांत यावयाची आहे. अर्थात् विशिष्ट गरजा ध्यानांत येऊन या तरतुदींत कदाचित् थोडेसे फेरबदल करावे लागतील.

### राष्ट्रीय उत्पन्न आणि नोकरी व कामधंदा

या सर्व विकासाचा परिणाम राष्ट्रीय उत्पन्न वाढण्यांतहि दिसून येईल. राष्ट्रीय उत्पन्न १९५५-५६ मधील १०,८०० कोटी रुपयांवरून १९६०-६१ मध्यें १३,४८० कोटी रुपयांवर म्हणजे सुमारें २५ टक्क्यांनीं वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे. परिणामीं, दर माणशीं दर वर्षीं उत्पन्नांतहि सुमारें १८ टक्क्यांनीं म्हणजे १९५५-५६ मधील २८० रुपयांवरून १९६०-६१ मध्यें ३३० रुपयांपर्यंत वाढ होईल. पहिल्या योजनेंत ही वाढ १० टक्के किंवा २५५ रु. वरून २८० रु. पर्यंत झाली.

### आर्थिक साधनें

४८०० कोटी रुपयांच्या या एकूण खर्चासाठी लागणारा पैसा कोणत्या मार्गांनीं उभारण्यांत येईल त्याचा तात्पुरता अंदाज पुढें दिला आहे :—

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | |
|---|---|
| १. चालू महसुलांतील शिल्लक | ८०० |
| (अ) करांच्या चालू दरानें | ३५० |
| (ब) नंवे कर बसवून | ४५० |
| २. जनतेकडून पैसा उभारणें | १२०० |
| (अ) कर्ज उभारून | ७०० |
| (ब) अल्प बचतींद्वारां | ५०० |
| ३. अर्थसंकल्पीय इतर साधनांद्वारें | ४०० |
| (अ) विकासकार्यक्रमांसाठी रेल्वेकडून मिळणारी रक्कम | १५० |
| (ब) प्रॉ. फंडांतील व इतर ठेवींतील रकमा | २५० |
| ४. परराष्ट्रीय मदत | ८०० |
| ५. तुटीचा अर्थ भरणा (डेफिसिट फायनान्सिंग) | १२०० |
| ६. अद्याप भरून काढावयाची राहिलेली फट | ४०० |
| एकूण | ४८०० |

### परकीय चलनाची परिस्थिति

गेल्या दोन वर्षांत देशाच्या देण्याघेण्यांतील शिलकेच्या परिस्थितींत बरीच सुधारणा दिसून आली आहे. १९५४ सालीं चालू खात्यावरील देण्याची परिस्थिति जवळ जवळ समतोल होती आणि १९५५ मध्यें थोडीशी शिल्लक राहील असा अंदाज आहे. विकासखर्चाचा वेग वाढतां असतांहि दिसून आलेली ही सुधारणा हें पहिल्या योजनेच्या काळांत देशाच्या आर्थिक घडींस प्राप्त झालेल्या वाढत्या बळकटीचें चिन्ह आहे. दुसऱ्या योजनेच्या काळांत फार मोठी रक्कम खर्चीं पडणार असल्यामुळें

आणि मूलभूत उद्योगधंदे आणि वहातूक यांच्या विकासावर भर देण्यांत आला असल्यामुळें देशाच्या परकीय चलनाची परिस्थितींवर निःसंशयपणें अधिक ताण पडेल.

या चलनाची गरज आणि ते मिळण्याची शक्यता या गोष्टींची प्राथमिक पाहणी करण्यांत आली त्यावरून असें वाटतें कीं दुसऱ्या योजनेच्या काळांत चालू खात्यावरील देण्याच्या शिलकेंत एकूण ११०० कोटी रुपये तूट पडेल. ही तूट खासगी परकीय भांडवल आणि देशाच्या परकीय चलनाची गंगाजळी यासुद्धां इतर बाह्यसाधनांद्वारें भरून काढावी लागेल.

### निर्यातींत वाढ

परकीय चलन बऱ्याच प्रमाणांत लागणार असल्याकारणानें निर्यातींत वाढ करण्यासाठी हरप्रयत्न करावे लागणार आहेत. भारताच्या निर्यातीच्या वस्तू व्यापाराची व्याप्ति सध्यां फारच संकुचित असून ताग, चहा, कापड, अशुद्ध उद्भिज-खनिजें आणि गळित धान्यें यांसारख्या वस्तूंसाठी निर्यात व्यापारांत सुधारणा करणें इष्ट आहे. इतर ग्राहकोपयोगी मालाच्या नवीन निर्यातींतून आणि इंजिनियरिंग मालाच्या निर्यातींतून फारच थोडी मिळकत होते. यांमध्यें थोड्या वेळांत वाढ होण्याची अपेक्षा करणें शक्य नसलें तरी आपल्या निर्यात व्यापारांत विविधता आणण्याच्या दृष्टीनें प्रारंभ करणें ही गोष्ट महत्त्वाची आहे.

चालू खात्यावरील अंदाजें ११०० कोटी रुपयांची तूट भरून काढण्याकरितां भारताच्या पौंडी गंगाजळींतून सुमारें २०० कोटी रुपये बिनशर्त काढतां येतील, आणि ही उचल केल्यानंतर योजनेच्या अखेरीस ही गंगाजळी सुमारें ५०० कोटी रुपयांची राहील. एवढी रक्कम म्हणजे देशाच्या सात महिन्यांतील आयातीइतकी होत असल्यामुळें देण्याच्या बाकींत कांहीं काळ अडचण भासूं लागल्यास वेळ निभावून नेण्यासाठी एवढी शिल्लक ठेवणें आवश्यक आहे.

---

### भारतांत वेडेपणांत वाढ

भारतांत, दर मिनिटाला दोन माणसें वेडीं होतात, असा कलकत्ता येथील इंडियन सायको-थेरॅप्युटिकल सोसायटीचा निष्कर्ष आहे. १४ ते २५ वर्षांच्या दरम्यानचे लोक वेडे होण्याचा सर्वांत ज्यास्त संभव असतो. जीवनाचा ताण सहन होण्याची असमर्थता, हें त्याचें प्रमुख कारण आहे.

---

### ग्रेट ब्रिटनचा बँक रेट ५½% झाला

बँक ऑफ इंग्लंडनें आपला बँक रेट १६ फेब्रुवारी रोजीं ४½% चा ५½% केला. २१ सप्टेंबर, १९३१ नंतर बँक रेट इतका भारी कधींच नव्हता; त्यावेळीं तो ६% होता. हप्तेबंदीनें खरेदीवर नियंत्रणें, राष्ट्रीयीकरण केलेल्या उद्योगांच्या भांडवली खर्चांत घट, सरकारी खर्चांत काटकसर, लष्करी खर्चाला थोडी कात्री, बचतीची मोहीम, इत्यादि योजनाहि जाहीर होत आहेत. ग्रेट ब्रिटनची आयात व निर्गत ह्यांतील तफावत वाढत चालली असून डॉलर्सचा तुटवडा भासूं लागला आहे, त्यासाठीं हें सर्व करण्यांत येत आहे.

## तृतीय अखिल भारत हातमाग सप्ताह संदेश

तृतीय अखिल भारत हातमाग सप्ताह मुंबई राज्यांतील निरनिराळ्या जिल्ह्यांत साजरा होत आहे हें ऐकून आनंद झाला. ह्या शुभप्रसंगीं आपल्या जिल्ह्यांतील सर्व विणकरांसंबंधीं मी सदिच्छा प्रदर्शित करितों. हातमागाच्या धंद्यास आणि हातमाग चालविणाऱ्या विणकऱ्यांस चांगले दिवस यावेत, त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारावी, म्हणून हिंदुस्थान सरकार व आपलें राज्य-सरकार ह्यांनीं बऱ्याच योजना आंखल्या आहेत आणि अमलांत आणल्या आहेत. द्वितीय पंचवार्षिक योजनेंत कापडाचें सर्व अधिक उत्पादन हातमागासाठी राखून ठेवण्यांत यावें या मतास अधिकाधिक पाठिंबा मिळत आहे. योजनेच्या पांच वर्षांच्या काळांत देशांतील विणकऱ्यांची परिस्थिति सुधारण्यासाठी १०० कोटी रुपये खर्च करण्याचें सरकारनें योजलें आहे. कारागीर, शेतकरी, मजूर वगैरे गरीब जनतेस सहकार हा एकच तरणोपाय आहे, तेव्हां विणकरांनीं संघटित होऊन आपल्या सहकारी मंडळ्या स्थापन कराव्या, सरकारच्या विविध योजनांचा फायदा घ्यावा, आणि कापडासंबंधीं देशाची अधिक उत्पादनाची जरूरी भागवावी अशी माझी विणकऱ्यांस प्रार्थना आहे. सर्वांच्या हार्दिक सहकारानें विणकऱ्यांची परिस्थिति सुधारो हीच इच्छा !

आर. एम्. तळपदे,
ऑ. एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर
बॉंबे प्रॉ. को. इन्स्टिट्यूट

---

### मध्यवर्ती बँकांचा बँकरेट

| देश | चालू दर | देश | चालू दर |
|---|---|---|---|
| अर्जेंटिना | ३½ | आयर्लंड | ३ |
| ऑस्ट्रिया | ५ | इटली | ४ |
| बेल्जम | ३ | जपान | ७·३ |
| बोलिव्हिया | ६ | मेक्सिको | ४½ |
| कॅनडा | २¾ | नेदरलंडस् | २½ |
| सिलोन | २½ | न्यूझीलंड | ७ |
| चिली | ४½ | नॉर्वे | ३½ |
| कोलंबिया | ४ | पाकिस्तान | ३ |
| कोस्टारिका | ५ | पेरू | ६ |
| डेन्मार्क | ५½ | पोर्तुगाल | २½ |
| इक्वेडॉर | १० | द. आफ्रिका | ४½ |
| इजिप्त | ३ | स्पेन | ३¾ |
| सालव्हेडॉर | ३ | स्वीडन | ३¾ |
| फिन्लंड | ५ | स्वित्झरलंड | १½ |
| फ्रान्स | ३ | टर्की | ४½ |
| जर्मनी | ३½ | ग्रेटब्रिटन | ५½ |
| ग्रीस | ९ | रशिया | ४ |
| भारत | ३½ | अमेरिका | २½ |
| इंडोनेशिया | ३ | | |

तमाम दंतरोगांवर
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठे महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | पन्नास लक्ष रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | पंचवीस लक्ष रु. |
| वसूल भांडवल | साडेबारा लक्ष रु. |

संचालक मंडळ :

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., *अध्यक्ष*
२. डॉ. ना. भि. परुळेकर, एम्. ए., पीएच्. डी.
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम ऊर्फ बाळासाहेब नाईक

मुख्य ऑफिस :—४५५ रविवार पेठ, पुणें २

शाखाः—(१) सदाशिव पेठ, पुणें १. (२) डेक्कन जिमखाना चौक, पुणें ४. (३) सोलापूर (४) सांगली.

मुख्य ऑफिस व सांगली येथें माफक भाड्यांत सेफ–डिपॉझिट लॉकरची सोय. खातेदारांना भाड्यांत सवलत.

सदाशिव पेठ व डेक्कन जिमखाना शाखांच्या कामाच्या वेळा सकाळ–सायंकाळ आहेत.

व्याज—चालू ठेव अर्धा टक्का.★सेव्हिंग्ज—दीड टक्का

तीन महिन्यांपासूनच्या मुदतठेवीवर ३ टक्के व्याज.

गो. गं. साठे, मॅनेजर



# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

## दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतींचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

दा. पुं. दर्डे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.